
# झेप

"युवकांच्या विकासासाठी"



फेब्रुवारी २०२१ | अंक आठवा

छायाचित्र-कलेवर विजुअल्स, अन्स्प्लाश

प्रिय वाचक,

हा झेपचा आठवा मराठी अंक आहे.

अंक वाचण्यास अधिक रंजक आणि उपयुक्त ठरावा, तुमच्यापर्यंत आम्ही जी माहिती पोहचवत आहोत ती जास्तीत जास्त बिनचूक असावी असा आमचा प्रयत्न असतोच.

मासिक सुरु करण्यामागचा उद्देश असा आहे की, कॉलेजवयीन विद्यार्थ्यांना भारताचे भविष्य मानले जाते. आपल्या सर्वांमध्येच वेगवेगळे कौशल्ये आणि क्षमता आहेत. परंतु मोबाईलचा वापर वाढल्यामुळे आपण आपल्या कौशल्ये आणि क्षमतांचा पुरेपूर वापर न करता वेळ वाया घालवतो आहे की काय हा प्रश्न आपणच स्वतःला विचारला पाहिजे.

आपण पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करतांना आपली संस्कृती विसरत आहोत. आपल्या देशात अशा कित्येक गोष्टी आहेत ज्या इतर कोणत्याही देशात नाही. आपल्या दैनंदिन जीवनासाठी त्या अगदी पूरक आणि फायदेशीर आहेत. या गोष्टींची जाणीव आपल्यामध्ये असावी आणि ते आपल्याला सतत आठवत रहावं.

ज्या विद्यार्थ्यांना कॉलेज मध्ये इतरांसमोर व्यक्त होता येत नाही त्यांच्यासाठी हे माध्यम उपलब्ध व्हावं. यासाठी हे मासिक सुरु केले आहे. आपण याचे स्वागत प्रेमाने केले आहे याचा खूप आनंद आहे.

- शरयू झंवर, संपादक.


**संपादक**

शरयू झंवर

**तांत्रिक संपादक**

ओम देशमुख

**माहिती प्रमुख**

सायली अभंग

**आमचे साथीदार**

रसिका परदेशी, सुवर्णा कुटे, संयुक्ता पाथरकर, अफान शेख, हर्षल कासार

# अनुक्रमणिका

१.महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य : चावंड, नाणेघाट

२.पुस्तकातील गोष्ट

३. आमच्या वेळची शाळा


४. अनोखा भारत : पुरातन मंदिर

५. पर्यावरण संवर्धन, काळाची गरज

६. व्यक्त व्हा

# महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य : चावंड, नाणेघाट

- किरण झंवर



# महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य

रोजच्या धावपळीच्या आणि ताणतणावाच्या वातावरणातून मस्त उसंत हवी असेल तर गिर्यारोहण हा पर्याय अति उत्तम आहे. महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या रांगा म्हणजे गड-किल्ल्यांची रेलचेल असलेला परिसर आहे. या रविवारचा आमचा ट्रेक चावंड-कुकडेश्वर मंदिर-नाणेघाट आणि नाणाचा अंगठा येथे सूर्यास्त, असा भरगच्च होता. संगमनेरहून सकाळी ७ वा. निघालो. चावंड उर्फ प्रसन्नगड हा जुन्नर तालुक्यातील गिरिदुर्ग प्रकारातील किल्ला आहे. चावंड तसा आडवाटेवरील किल्ला परंतु ऐतिहासिक महत्व असलेला असा आहे.संगमनेरहून चावंडला जाण्यासाठी प्रथम जुन्नर शहर गाठावं, तेथून आपटाळे-घाटघर रस्त्यावर 15 किमीवरील चावंडवाडी फाट्यापर्यंत गाडी  जाते. गाडी तेथे लावून चावंडवाडीच्या दिशेने चालत गेलो. वाडी अतिशय सुबक आणि वनराईने नटलेली आहे. वाडीच्या उजव्या बाजूला चावंडच्या गडाच्या पायर्या सुरु होतात. पायथ्याला, काही पाट्या आहेत. किल्ल्याचा इतिहास आणि काय बघावे हे फोटोसहित लिहिलेले आहे. नव्याने बांधलेल्या दगडी पायर्या चढून गेल्यावर उभा कातळ आहे. या कातळांत कोरलेल्या पायर्यांची (रेलिंगच्या मदतीने) चढाई करताना समोर आणि दोनही बाजूला सरळसोट कडे यांचा धमाल आणि थरार अनुभवणे रोमांचकारी आहे. कातळामधून काढलेल्या साधारण १६० पायर्यांची चढाई अतिशय सुंदर आहे. पायर्या संपताच किल्ल्याचा दरवाजा जो कातळातून काढलेला आणि एल आकाराचा असा आहे. समोर दगडांत कोरलेला गणपती मन मोहून टाकतो. दरवाजा ओलांडून गेल्यावर उजव्या बाजूला पायर्या चढून बालेकिल्ल्याची वाट आहे. आणि डाव्या हाताला सात टाक्यांचा समूह आणि यादवकालीन गुहा आहेत. रविवार असल्यामुळे हौश्या नवश्यांची गर्दी होती म्हणून आम्ही आगोदर डाव्या बाजूने गडाची भटकंती करण्याचे ठरविले.

उन्हं बर्यापैकी चटकत असल्यामुळे गडावरील  गवत बर्यापैकी सुकले होते. सुकलेल्या गवतातून वाट काढत सर्वप्रथम सात पाण्याच्या टाक्यांजवळ पोहचलो. अतिशय सुबक एकात एक गुंफलेल्या आणि विशेष म्हणजे प्रवेशद्वार असलेल्या या टाक्या मुग्ध करून टाकतात. गडावरील भटकंती भरपूर आहे. यादवकालीन टाके मोठ्या, ऐसपैस लेण्या आणि तेथून दिसणारे माणिकडोह धरणाचे पाणी आनंद देऊन जाते. डावीकडील संपूर्ण गड फिरून उजवीकडे वाटचाल सुरु केली. बालेकिल्ल्याच्या खाली देखील दोन मोठे पाण्याचे टाके आहेत. तेथून चावंडा मातेच्या मंदिराचे कळस दिसत होते. आजूबाजूला भरपूर झाडी आणि मधे पायवाट असलेली छोटीशी चढण  मंदिराकडे घेवून जाते. सुंदर अशी ही पायवाट चामुंडा मातेच्या छोटेखानी दगडी मंदिरा समोर घेऊन जाते. दर्शन घेऊन गडाचा मुख्य भाग पाहावयास सुरुवात केली. गडाच्या उजव्या भागात एक तोफ ठेवलेली आहे. तेथून पुढे सदरचे अवशेष आहेत. पठारावरील कोनाडेयुक्त जलकुंड, देवालयांचे भग्नअवशेष मोठ्या वाड्याचे जोते, असे अनेक अवशेष पहावयास मिळतात. चावंड गडाचा विस्तार आणि ऐतिहासिक महत्व जाणून पायर्या उतरावयास सुरु केले.

तेथुन कुकडी नदीच्या उगमस्थानी असलेले कूकडेश्वर मंदिर पाहावयास मिळते. दगडी बांधकाम आणि कोरीव काम अतिशय सुरेख आहे.मंदिर परिसरात यथेच्छ जेवण झाल्यावर नाणेघाटाच्या दिशेने निघालो. नाणेघाट हा सगळ्या गिर्यारोहकांचा  जिव्हाळ्याचा विषय असावा



कुकडेश्वर मंदिर

ऐसपैस गुहा, पोहचण्यासाठी सोपी वाट, कोकणातून देशावर येण्यासाठीची अगदी जुनी वाट, त्यावेळी जकात गोळा करण्यासाठी ठेवलेले मोठे दगडी रांजण असा थाटमाट असलेला नाणेघाट कितीदाही गेलो तरी आकर्षित करीत राहतो.

शेवटी नानाचा अंगठा, छोटीशी चढण चढल्यावर माथ्यावरून संपूर्ण कोकणपट्टा  न्याहाळत, सूर्यास्त पाहणे म्हणजे पर्वणीच असते..मनमोहक सुर्यास्त पाहून, कितीतरी फोटो घेऊन खाली उतरलो. संधीप्रकाशाच्या रंगाबरोबर,  संगमनेर साठी परतीचा प्रवास सुरू झाला.

**लेख - किरण झंवर**




# पुस्तकातील गोष्ट

- मनीषा उगले

इंजिनिअर असलेल्या नायकाचं बोट पकडून आपण सौराष्ट्राच्या प्रवासाला निघतो. सागर किनाऱ्यावरच्या एका अत्यंत विरळ लोकवस्तीच्या मागासलेल्या प्रदेशात नायकाची नियुक्ती झालेली आहे. रासायनिक कारखाने उभे करण्यासाठी सरकारी जमिनींची मोजणी करायला तो आलाय. दूरवरच्या एका गजबजलेल्या शहरातून एकदम या वैराण प्रदेशात येऊन पडल्यावर तो काहीसा निराश आणि अस्वस्थ झाला आहे.

या भूमीत पाऊल टाकल्यापासून जसा अभावग्रस्त जीवनाला तो सामोरा जातो आहे, त्याच जोडीला त्याला भेटत आहेत ती इथली अनोळखी माणसावर सुद्धा जीवापाड प्रेम करणारी माणसं. ज्यांच्या घरात खायला दाणा नाही, अंगावर पुरेसे कपडे नाहीत, आरोग्याच्या सोयी तर सोडाच पण होड्या, गाढवं आणि एखादा घोडा याशिवाय ज्यांच्याकडे वाहतुकीची साधनं सुद्धा नाहीत अशी वंचित माणसं इतकी आनंदी आणि उदार मनाची कशी? हे पाहून नायक चकित होतो.

नायकाला रहाण्यासाठी आणि ऑफिस थाटण्यासाठी एक सरकारी हवेली मिळाली आहे. समुद्रकिनारी इतक्या उजाड परिसरात उभ्या असलेल्या या एकमेव वास्तूच्या पोटात अनेक रहस्यं दडलेली आहेत. हवेलीवर साहेबाला (नायकाला) मदत करण्यासाठी काही स्थानिक स्टाफ नेमलेला आहे.

अफाट मेहनत करण्याची क्षमता असलेला नोकर सबूर, या वैराण प्रदेशात निगुतीनं वाढवलेल्या बाभळींवर आणि पक्ष्यांवर प्रेम करणारा जंगलअधिकारी नूरभाई, दर्यादिव येऊन राहतो त्या एका भेंसल्यावर की जिथे कोणीही जायची हिंमत करत नाही अशा ठिकाणी जाऊन येणारा शूर तांडेल किष्ना अशी काही इंटरेस्टिंग पात्रं साहेबाला या प्रदेशात भेटतात. सगळ्यात रोचक पात्रं आहेत ती म्हणजे बंगालीबाबा आणि अवल. किड्यामुंग्यांपासून समुद्रासोबत सुद्धा बोलू शकणारा बंगालीबाबा हा एक गूढ मनुष्य आहे. निसर्गाची भाषा त्याला अवगत आहे.

अवल ही स्वाभिमानी आणि तत्त्वनिष्ठ स्त्री आहे, ती कोण आहे, हवेलीशी तिचा काय संबंध आहे हे जाणून घेणं फार रंजक आहे.

स्थानिक जीवनाशी जुळवून घेताना साहेब हळूहळू इथलाच एक होऊन जातो. या भूमीवर, समुद्रावर आणि माणसांवर त्याचा जीव जडतो. ही भावनाशीलता त्याला 'नेमून दिलेलं काम करू नकोस' असा आंतरिक साद घालू लागते.

निसर्ग आणि मनुष्यजीवन यांचा सहसंबंध कथानकातून हळुवारपणे उलगडताना लेखकाने केलेलं सुरेख चिंतन या कादंबरीतून आढळतं. हे केवळ कथेसाठी कथा सांगणं नाही. घटनांतल्या 'मधल्या' जागांतून जीवनाकडे बघण्याचा लेखकाचा व्यापक दृष्टिकोन आपल्याला दिसतो.

काम पुढे नेऊ की राजीनामा देऊ या द्वंद्वात सापडलेला साहेब पुढे काय करतो? समुद्री वादळाबद्दल बंगालीबाबाने वर्तवलेल्या भाकिताचं पुढे काय होतं? साहेबाची गूढ भेंसल्यावर जाण्याची इच्छा पूर्ण होते का?

कादंबरी वाचताना ही सारी रहस्ये उलगडत जातात.

बुद्धी आणि मनगटाच्या जोरावर भव्य निर्मिती करण्याची महत्त्वाकांक्षा माणूसप्राणी बाळगून असतो. पण सर्वव्यापी, सर्वपोषी आणि सर्वनाशी क्षमता बाळगून असलेल्या निसर्गाच्या सानिध्यात गेल्यावर, त्याला समजून घेतल्यावर माणसाच्या वृत्तीत, विचारांत कसा बदल होत जातो याची ही गोष्ट आहे.


थोर गुजराती लेखक ध्रुव भट्ट यांच्या 'समुद्रान्तिके' या गुजराती साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कादंबरीचा अनुवाद अंजली नरवणे यांनी 'सागरतीरी' नावाने केला आहे.

(मेहता प्रकाशन)



साहित्य अकादमी मिळण्यासारखं या कादंबरीत काय विशेष आहे हे ती वाचायला घेतल्यावर लगेचच लक्षात येतं.

ध्रुव भट्ट हे गुजरातीतले फार महत्त्वाचे लेखक आहेत. कथासूत्राला व्यक्तीकडून समष्टीकडे नेण्याची त्यांची हातोटी विलक्षण आहे. कथानक 'प्रेडिक्टेबल' नसणं हे त्यांच्या लेखनाचं महत्त्वाचं वैशिष्ट्य. आणखी गंमत तर यात आहे की ध्रुव भट्टांच्या कादंबरीतील नायकाचं नाव आपल्याला शेवटपर्यंत समजत नाही आणि तरीही तो आपल्याला आपल्यातलाच एक वाटत राहतो.  आपल्याला माणूस म्हणून समृद्ध करणारी आणि जीवनाची भव्यता दाखवणारी ही कादंबरी आवर्जून वाचावी अशीच आहे.




**सागरतीरी पुस्तकाचे मुखपृष्ठ**

**- मनीषा उगले**



# आमच्या वेळची शाळा

- नीलिमा क्षत्रिय



मागच्या वर्षी सिनिअर केजीला असलेल्या नातीच्या शाळेत जाण्याचा योग आला. तिची बस हुकली म्हणून मुलीबरोबर तिला सोडायला गेले होते. शाळा भरायला पाच मिनिटं बाकी होती. मुलं गेट मधून येतच होती. कुठलंही मूल जड पावलं टाकत किंवा अनिच्छेनं येताना दिसत नव्हतं. गेटपासून थोड्या अंतरावर दोन तीन 'मिस्स' उभ्या होत्या. मुलं जवळ आली की खाली वाकून त्या मुलांशी खूपच प्रेमाने बोलत होत्या. काही तर मुलांना 'हग' पण करत होत्या. अगदी व्हीआयपी ट्रीटमेंट होती मुलांना. बस हुकल्यावर मी नातीला म्हटलं होतं 'जाऊ दे नको जाऊस आज'.. पण तिने ऐकलं नाही...आईला गाडी काढून शाळेत सोडायलाच लावल. मी मनात म्हटलं, "अग बाई, शाळा बुडवण्यासाठी आम्ही काय काय नाटकं करायचो".. पोट दुखतंय, डोकं दुखतंय.... "कसंतरी होतंय" नावाचा आजार तर फारच फोफावलेला होता तेव्हा..ह्या रोगाची लक्षणे साधारण पणे शाळा भरायच्या आधी एखादा तास दृगोच्चर होत असत. आणि शाळा भरून एखादा तास झाला की रोगाची लक्षणे आश्चर्यकारक रित्या नाहिशी हेत..

ह्या रोगात रूग्णाला कशानेच आराम पडायचा नाही. पालकांच्या डोळ्यात आजारासंबंधी थोडाजरी अविश्वास दिसला तरी लक्षणे भलतीच उफाळून येत..मग रूग्ण गडाबडा लोळूही लागे, मधेच पोट दुखू लागे, कधी भयंकर डोके दुखे.. रूग्ण पोट दाबून मोठमोठ्याने विव्हळत असे.. डोकं गच्च दाबून उशीत खुपसत असे... ताप उलट्या अशी दृष्य लक्षणे ह्या रोगात अजिबात नसत.. फक्त आतून दुखणारी लक्षणे..बहुतेक पालकांना ह्या रोगाची कारण मिमांसा माहीत असायची.. मग रोग्याने अजूनय जास्त आजारी पडून त्यांनाच वात आणू नये म्हणून ते रूग्णापुढे हात टेकत, आणि परवलीचा मंत्र म्हणत.."नको जाऊस शाळेत".. बस एवढा मंत्र कानावर पडला की रूग्णाला उतार पडायला सुरूवात होई..आणि शाळेची वेळ टळली की रोगी टुणटुणीत होऊन गावभर उंडारू लागे.

पण नातीच्या शाळेतलं वातावरण बघून ती शाळा का बुडवत नाही त्याचं कोडं मला उलगडलं. आणि आमची शाळा आठवली..

"छडी लागे छम छम विद्या येई घम घम."..वर्गात शिरल्या शिरल्या मास्तरांच्या डोक्यावर दिसेल अशा बेतानं भिंतीवर लावलेलं आमच्या काळातलं हे वाक्य...घमघम विद्या येण्याच्या आशेवर आमच्या पिढीतली पोरं मरेस्तोवर मास्तरांच्या छड्या खात राहिली....एखाद दुस-या मुलाच्या घरी मुंडावळ्या बांधून 'विद्या' आली असेल तेवढीच..

बाकीच्यांचा आणि विद्येचा कुठल्याही प्रकारे संबंध आला नाही. बाकीची पोरं विद्येचं झाड ओरबाडून तीच विद्या पुस्तकातून जोपासत राहिली.. मार खाण्याचे शिक्षेचे असंख्य प्रकार...वेताची छडी, बाभळीची छडी, पट्टीची छडी..पट्टीची छडी तीन प्रकार मारली जायची, उभी आडवी, पोटात खुपसून..छडी स्विकारण्याच्या जागा..पायांवर,अंगावर, डोक्यात..मास्तरला वाटेल तिथे. छडीचा वापर पोरांवर जास्त कल्पकतेने व्हायचा...मुलींवर छड्या कमी पण अपमानाचे, जळके कुजके शब्दांचे बाण .भरपूर..

हाणून, बुकलून पोरांना 'वळण लावून सरळ करणे' ह्या उदात्त ध्येयाने पछाडलेले शिक्षक तेव्हा असत...काही शिक्षक वर्गात असले की कोणी, पिळलेला कान गोंजारत रडवलं होऊन बसलंय, कोणी छड्या खातंय, कोणी शिव्या खातंय, कोणी एवढ्या धामधुमीत दप्तरात हात घालून डबा खातंय असं असं दृष्य दिसत असे...

बालपणीचा काळ सुखाचा असं म्हणतात..आणि ते खरंही होतं. खरंच खूप सुखाचं होतं माझं बालपण.. पण चांगल्या सुखाच्या बालपणाला ही शाळा नावाची वाळवी लागली..तिने माझं सगळं बालपण पोखरून टाकलं. असं वाटायचं कोणाच्या डोक्यातून ही अशी क्रूर कल्पना आली असेल बरं. चांगले हरणांसारखे बागडणारे जीव त्या कोंडवाड्यात कोंडायचे..त्यांना पुढेआयुष्यात कधीही न भेटणारे ते लिटमस पेपर, मोरचूद, लोहचूंबक आणि लोखंडाचा कीस, अमिबा, पॅरमिशिअम, खारे वारे मतलई वारे...काय..कारणच काय होतं हे सगळं बालजीवांच्या बोकांडी मारायचं..कुठं कधी संबंध आला ह्या मंडळींशी? कधी कोणी ह्या वस्तू हाताळल्या बरं पुढील आयुष्यात..

बाकी विषय बिचारे गरिब मित्रत्वाने वागणारे होते पण गणित नावाचा एक बलाढ्य शत्रू मला पुरते नामोहरम करायचा...

गणिताचा तास आला की माझी भिगी बिल्ली होत असे..ते गळके हौद, त्या मोडक्या तोट्या, ह्यानी इतके पेरू आणले ,त्याला इतके दिले, त्याने त्याला परत इतके दिले... तर किती उरले..अरे तू आणले तर तू खा ना बाबा, कशाला ह्याला त्याला वाटतोस.. पुन्हा परत घेतोस, आमच्या डोक्याला घेण्या न देण्याचा ताप.. आणि ते गळके हौद अन तोट्या पण तेव्हाच्या तेव्हा दुरूस्त केल्या असत्या तर पुढच्या कित्येक पिढ्यांची बालपणं अशी नासली असती का? किती जणांनी पुढे गळक्या टाकीत पाणी भरलं असेल?

कोणीही शहाणा माणूस आधी गळती थांबवेल मगच पाणी भरेल ना त्यात..जेमतेम पासिंगचा भोज्जा शिवण्यापुरते मार्क्स पडायचे मला त्यात.. इतिहास विषय मला फार आवडायचा, पण परिक्षेत नेमक्या सनावळ्याच जास्त यायच्या..एकतर आकडे पाहिले की मला त्या बलाढ्य शत्रूच्या आठवणीने फीट आल्यासारखा तोंडाला फेस यायचा....त्यात प्रश्न सगळे...आमका तह किती साली झाला, तमकी लढाई किती साली झाली, ह्याचा जन्म किती साली त्याचा मृत्यु किती साली....चांगला आवडीचा विषय पण चांगले मार्क मिळू द्यायचे नाहीत, अशी प्रतिद्न्याच केलेली सगळ्या शिक्षण खात्याने. एकदा प्रश्न आला प्लासीची लढाई किती साली झाली..मी उत्तर लिहिलं "माझ्या जन्माच्या आधी..

चित्रकला विषय सगळ्यात आवडता...हा विषय न आवडणारे पण महाभाग असायचेच.. ह्या विषयात पण ऐन वेळी वॉटर कलर वापरायचा मोह व्हायचा आणि सगळ्या चित्रावर वॉटर फिरायचं.

वर्षातून एकदा शाळेत कॉलराचं इंजेक्शन टोचणारे यायचे..पोरांना बातमी लागली की बरीच पोरं शाळेतून पसार होत..त्यामुळे शिक्षकांकडून ही बातमी फुटणार नाही ह्याची खबरदारी घेतली जायची...पण पोरं बरोबर काढायचेच बातमी..मग ती बातमीदार पोरं वर्गात एका बाजूला उभं राहून अगदी खाजगी आवाजात ही बातमी सगळ्या वर्गाला पुरवायची. बातमी पुरवताना गनिम पाठीवर असलेल्या मावळ्यांचा भाव चेह-यावर..पोरं लगेच रडकुंडी यायची..मग बातमीदारांना खूप चेव चढायचा. लगेच पुरवणी बातमी पेश केली जायची..."सुया लई जाडेत ह्या टायमाला..खिळ्यासारख्या". की रडकुंडी आलेली पोरं डायरेक्ट भोकाड पसरायची..सगळ्या वर्गात एकच रडारड, गोंधळ...पळून जाण्यासाठी दाराकडे धावाधाव.. तिथे शाळेचा शिपाई रिंगमास्तरसारखा बसलेला असायचा.. काही ओव्हर अॅक्टींगच्या अवलादी खिडक्यांच्या ग्रीलवर चढून लटकायचे. तिथून मोठमोठ्यानी धाय मोकलून रडायचे आणि उरल्या सुरल्या धीर धरणा-यांचा पण धीर सुटायचा..पाच मिनिटातच कसायाच्या कोंडवाड्यासारखी वर्गाची गत व्हायची

**- नीलिमा क्षत्रिय**

# अनोखा भारत

- रसिका परदेशी



छायाचित्र - सौरभ अग्रवाल, उन्स्प्लाश

महाराष्ट्रातील प्राचीन मंदिरे महाराष्ट्राची शान आहेत. या मंदिरांची अनेक वैशिष्ट्ये आहेत. बऱ्याचदा आपल्याला मंदिरांच्या बाबतीत सखोल माहिती नसते. ही मंदिरे साधारण किती प्राचीन आहेत अथवा त्यांचा इतिहास काय आहे याबद्दल माहीत नसते. पण तरी या देवस्थानांना भेट द्यायला अनेकांना आवडते कारण त्याला एक इतिहास लाभला आहे. त्यासोबतच अनेक मंदिरांवरील कलाकुसर हेदेखील एक आकर्षण आहे. आपल्या वास्तुशिल्पकारांनी बांधलेली ही मंदिरे महाराष्ट्रातील अप्रतिम कलाकुसर आहेत. अशाच एका प्राचीन मंदिराबाबत आपण जाणून घेणार आहोत.

**कैलाश मंदिर [अजिंठा, वेरूळ (औरंगाबाद)]**

भारतीय शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून वेरूळ लेण्यांकडे पाहिले जाते. हिंदू , बौद्ध आणि जैन संस्कृतीचे दर्शन घडविणारी शिल्पे या लेण्यांमध्ये आहेत. कळसापासून पायापर्यंत अशी निर्मिती झालेल्या कैलास लेणीतील कलाकुसर, कोरीव काम आश्चर्यकारक आहे. जागतिक वारसा स्थळांमध्ये समाविष्ट असलेल्या वेरूळला देश - विदेशातील लाखो पर्यटक भेट देतात. औरंगाबाद शहरापासून ३० कि . मी . वरील खुलताबाद तालुक्यात वेरूळ आहे. प्राचीन व्यापारमार्गाच्या छेदस्थानी वसलेल्या आणि शतकानुशतके पवित्र तीर्थक्षेत्र म्हणून ख्याती असलेल्या वेरूळचा उल्लेख अरब आणि युरोपियन प्रवाशांच्या प्रवासवर्णनामध्ये ठळकपणे आढळतो. चंद्रकोरीसदृश्य आकाराच्या डोंगरकुशीत वसलेली वेरूळ लेणी दख्खन पठाराभिमुख, दक्षिणोत्तर रेषेत वेरूळच्या डोंगरात सुळ्याच्या सहाय्याने कोरून काढण्यात आली आहे. बौद्ध लेणी क्रमांक १ ते १२ची निर्मिती इसवी सन पाच ते सातव्या शतकादरम्यान, हिंदू लेणी क्रमांक १३ ते २९ची निर्मिती इसवी सन आठ ते नवव्या शतकादरम्यान आणि जैन लेणी क्रमांक ३० ते ३४ची निर्मिती इसवी सन नऊ व आकराव्या शतकादरम्यान करण्यात आली.सरळ रेषेत वसलेल्या एकूण ३४ लेण्यांमध्ये बौद्ध चैत्य दालने, प्रार्थना गृहे, विहार किंवा आश्रम; तसेच हिंदू आणि जैन मंदिरे यांचा समावेश आहे. पाचव्या शतकापासून ते अकराव्या शतकापर्यंत सुमारे ६०० वर्षे चाललेल्या येथील कोरीव लेण्यांमध्ये धूमर लेणे ( लेणी क्रमांक २९ ) वेरुळचे सर्वात प्राचीन असून, यातील प्रार्थना मंदिरात शिवलिंग आहे. या काळात बुद्ध, हिंदू, व जैन धर्माचे वर्चस्व होते. त्यामुळे या धर्मांच्या संस्काराचे प्रतिबिंब लेण्यातून उमटलेले दिसते. अप्रतिम अशा ३४ गुहांतील मूर्ती म्हणजे धार्मिक आणि कलात्मकतेने नटलेल्या उत्तुंग रचना आहेत .

जगप्रसिद्ध आणि प्रभावशाली १६व्या क्रमांकाची कैलास लेणी भव्यता आणि एकात्मता याबाबत अजोड मानली जाते. जगातील सर्वात मोठी एकसंध वास्तू म्हणून प्रख्यात असलेले हे लेणे म्हणजे वास्तुकला, आणि शिल्पकलेचा एक अप्रतिम नमुना आहे. कैलास लेणी ही 'आधी कळस मग पाया' अशी तयार झालेली आहे. वेरूळ लेण्यांचे खोदकाम कसे झाले असावे, याची कल्पना १६व्या क्रमांकाची कैलास लेणी पाहताना येते. प्रथम रूपरेषा आखल्यानंतर छतापासून खोदकामास सुरुवात झालेली दिसते. दगड अत्यंत तीक्ष्ण हत्यारांनी खोदले जायचे. प्राथमिक खोदकाम जरी कुदळीसारख्या मोठ्या हत्याराने केले गेले असले, तरीही नंतरचे नाजूक कोरीव काम मात्र छिन्नी व हातोड्याने केलेले दिसते. डोळ्याचे पारणे फेडणारी ही कलाकुसर आहे. शैल्य स्थापत्यशास्त्राच्या प्रगतीचे टप्पे या लेण्यात पहायला मिळतात. भारतीय शिल्पकलेचा हा सर्वोत्कृष्ट नमुना आहे. रामायण, महाभारतातील पौराणिक प्रसंग, शिव महात्म्य, विष्णू अवतार, लक्ष्मी, गंगा, यमुना, सरस्वतीचे चित्रण या लेणीत असून, लेणीचे देखणेपण वाढवतात. वेरूळ येथील २१ क्रमांकाच्या लेणीत शिव - पार्वती विवाहाचा प्रसंग तर, २९ क्रमांकाच्या लेणीत शिवतांडव नृत्य दाखविले आहे. .

अर्धनारीनटेश्वरचे दर्शनही येथे होते. ३२ क्रमांकाची लेणी अत्यंत आकर्षक आहे. याच्या छतावरही कोरीव शिल्पकला असून, तेथे कमलपुष्पं दाखविली आहेत. अजोड मूर्तीकलेचा अप्रतिम नमुना म्हणून वेरूळ लेणीकडे पाहिले जाते. जगप्रसिद्ध वेरूळ लेण्या पाहताना शिल्पकला व चित्रकलेचे दर्दी आपल्या प्राचीन काळात अस्तित्वात होते, याची प्रचीती येते. या लेण्यांच्या संवर्धनासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभाग अथक परिश्रम घेत आहे. रसायनांचा वापर करून, विविध उपचार करून ती सुरक्षित ठेवण्याबरोबरच तिला नवी झळाळी देण्याचे महत्त्वाचे काम करीत आहे. त्यामुळेच पुढच्या पिढीला हा हजारो वर्षांपूर्वीचा ठेवा पाहायला मिळत आहे. युनेस्कोने सन १९८३मध्ये अजिंठा लेणी व वेरूळ लेणी जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले आहे.

वेरूळ लेणी आज संपूर्ण जगाला आकर्षित करीत आहे. भारत हा युनेस्को वारसामध्ये सभासद देश म्हणून स्थापनेपासूनच आहे. या अंतर्गत भारतातील एकूण २८ ठिकाणे  ‘जागतिक वारसा स्थळे’ म्हणून आजपावेतो नोंदली गेली आहेत. भारत देशातील वारसा स्थळांच्या यादीची सुरुवात १९८३पासून अजिंठा लेणी, वेरूळ लेणी (औरंगाबाद) आणि ताजमहाल (आग्रा) यांच्या नोंदीने झाली. दर मंगळवारी वेरूळ लेणी बंद असते. याविषयी व्यापक जनजागृती करण्याची आवश्यकता आहे. परदेशांतल्या, तसेच देशातल्या अनेक पर्यटकांना मंगळवारी लेणी बंद असल्याची माहिती नसते. त्यामुळे येथे आल्यावर त्यांचा हिरमोड होतो. वाढत्या प्रदूषणाचा फटका मानवी शरीर, पशुपक्ष्यांचे जीवन व सागरी जलचरांना जितका बसतो आहे, तितकाच तो प्राचीन बांधकामे, मंदिरे व लेण्यांनादेखील बसतो. पुरातत्त्व संशोधकांनी यावर वेळीच उपाय केले नाहीत तर हा प्राचीन सांस्कृतिक वारसा नष्ट होईल, असा गंभीर इशारा दिला जात आहे. आपल्या देशात अशा प्राचीन सुंदर स्थळी पर्यटकांची नेहमी गर्दी असते; पण म्हणावे तसे याकडे लक्ष दिले जात नाही. जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित झालेल्या वेरूळच्या लेण्यांच्या संवर्धनासाठी भारतीय पुरातत्व सर्व्हेक्षण विभागाने, लेण्यातील सूक्ष्म तड्यांतून झिरपणारे पाणी थांबविण्यासाठी विदेशी तज्ज्ञांनी मोठे काम केले. भारतीय पुरातत्त्व व भूवैज्ञानिक विभागाच्या अधिकाऱ्यांनी परिश्रम घेऊन लेणी संवर्धनाचे अनमोल कार्य केले आहे. वेरूळ हे जागतिक कीर्तीचे पर्यटनस्थळ आहे. वाढते प्रदूषण आणि शेकडो वर्षांपासून उन पाऊस खाणाऱ्या येथील शिल्पकलांना धोका पोहचू नये, यासाठी भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण विभागाने विशेष काळजी घेतली आहे. त्यामुळे या स्थळांविषयी आस्था असलेल्यांना दिलासा मिळाला आहे. मात्र भविष्यात वेरूळ लेण्यांना टिकवून ठेवण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने अधिक उपाययोजना करण्याची गरज आहे.

**- रसिका परदेशी**

# पर्यावरण संवर्धन, कालाची गरज

- शरयू झंवर



संक्रांतीनंतर हळू हळू वातावरणातील उष्णता वाढते. पण यावर्षी काहीतरी वेगळच घडतंय, संक्रांतीनंतर वातावरण हळू हळू अजून थंड होत आहे. यावेळी भर हिवाळ्यात सर्वत्र धो धो पाऊस पडला. इतका पाऊस पडूनही उन्हाळ्यात मात्र पाण्याची कमी भासतेच. वातावरणात इतका विरोधाभास का? याचा कधी विचार केला आहे का?

आपण आपल्या प्राथमिक गरजांसाठी पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असतो. दिवसेंदिवस आपल्या गरजा वाढत आहे. त्यासोबतच लोकसंख्या सुद्धा वाढत आहे. त्यामुळे आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी आपण निसर्गाची नासधूस करत आहोत. ही नासधूस खूप झपाट्याने होत आहे. त्यामुळे नैसर्गिक संतुलन बिघडत आहे.

मोठ्या प्रमाणावर होणारी जंगलतोड, अनेक प्रकारचे प्रदूषण, यामुळे पुर्थ्वीचे तापमान वाढत आहे. मागच्या काही दशकात गेल्या शंभर वर्षात यापूर्वी कधीही झालेली नाही एवढ्या झपाट्यानं तापमानवाढ झाली आहे. आत्तापर्यंत पृथ्वीचे तापमान १ अंशाने वाढले आहे. संपूर्ण पृथ्वीवरील जीवसृष्टीला यामुळे खूप मोठा धोका निर्माण झाला आहे. याचा एक परिणाम म्हणजेच वातावरण बदल. असे अनेक परिणाम सर्वत्र होत आहेत. त्यातील काही आपण अनुभवत आहोतच. या सगळ्यांमुळे संपूर्ण मानवजात आणि इतर जीवांना हानी होत आहे.

यापूर्वीही अनेकवेळा जागतिक तापमान वाढ झाली होती. याचे पुरावे च्या अस्तरात मिळतात. त्या वेळेसची तापमानवाढ ही पूर्णतः नैसर्गिक कारणांमुळे झाली होती. सध्याची तापमानवाढ ही पूर्णतः असून मुख्यत्वे हरितगृह वायू परिणामामुळे होत आहे.पृथ्वीलगतच्या वातावरणामध्ये कार्बन-डाय-ऑक्साईड व अश्याच काही अन्य घातक वायूंचे प्रमाण वाढले की हरितगृह परिणाम (GREENHOUSE EFFECT) होतो. हरितगृह परिणामामुळे पृथ्वीच्या तापमानात वाढ होण्याचा संभव असतो. जर हे लगेच थांबवलं नाही तर याचे गंभीर परिणाम आपल्याला येत्या काही वर्षात भोगावे लागतील. आपण करोना काळात तर निसर्गाची ताकद पहिलीच आहे. त्यासोबतच अनेक ठिकाणी आलेले पूर, त्यामुळे झालेली जैविक हानी याचेही अनेक उदाहरण आपण टीव्ही, वृत्तपत्रातून बघितले, वाचले आहेत. इतकी गंभीर समस्या असून देखील या विषयावर चर्चा होतांना दिसत नाही. कोणीही यावर बोलत नाही. हे लक्षात घेऊनच स्वीडन देशातल्या एका १७ वर्षांच्या मुलीने शाळेत जाण्यास नकार देऊन स्वीडनच्या संसदेसमोर आंदोलन सुरु केले. या मुलीमुळे संपूर्ण जगातील नेते मंडळी हलून गेली. तिने यांना सगळ्यांना जाब विचारला. “तुमची हिम्मत कशी झाली आमच्या भविष्यासोबत ढवळाढवळ करण्याची?” तिच्यासारखेच अनेक देशातील तरुण तरुणी जागे होत आहे. आणि या समस्यांवर काहीतरी उपाय काढण्यासाठी सरकार आणि इतरांना जाणीव करून देत आहे.


तर वाचकहो, आपण आपल्या वयक्तिक पातळीवर काही करू शकतो का? हो, कारण छोटे छोटे बदल खूप महत्वाचे आहेत.

गरज नसल्यास दुचाकीचा वापर टाळावा, .आपल्या परिसरातील ओला कचरा जाळून न टाकता त्याचा खतांमध्ये रुपांतर करावा, प्लास्टिकचा कमीत कमी वापर करावा, पाण्याची नासधूस थांबवावी, झाडे लावून त्यांची पूर्ण वाढ होईपर्यंत लक्ष ठेवावे. जगभरात अनेक युवक यावर काम करत आहेत. अनेकांनी विविध प्रकारे निसर्गाचे संरक्षण करण्यासाठीचे उपाय शोधून काढले आहेत. पुढील अंकामध्ये त्यावर चर्चा करू.

- शरयू झंवर

# व्यक्त व्हा...

- संयुक्ता पाथरकर



"देवांश, अरे दार उघड. मी समजावते ना बाबांना, तुझ्यावर नाही ओरडणार ते. दार उघड रे बाळा. मी बोलते बाबांसोबत. तू चूक केली आहेस म्हणून असं स्वतःला खोलीमध्ये बंद करून घेण हा पर्याय नाही. तू बोल ना आमच्या सोबत, सांग तुझ्या अडचणी. तू सांगितलं नाहीस तर कसं कळेल आम्हाला." आई प्रचंड त्रस्त होऊन देवांशच्या खोलीचा दरवाजा खडखवत त्याला समजावण्याचा प्रयत्न करीत होती.

देवांशला त्याच्या चुकीच्या वागणुकीचे खूप पश्च्याताप होत होते. त्याने स्वतःला अपराधी मानून खोलीत कोंडून घेतले होते. 'मी माझी सोन्याची अंगठी फालतू कारणासाठी विकली आहे. आणि ते आज घरी कळाले.' ही गोष्ट त्रासदायक तर होतीच. पण त्यापेक्षाही जास्त त्याला इतर काही अडचणी त्रास देत होत्या.

देवांश एका सुशिक्षित कुटुंबातील मुलगा होता. बाबा सी.ए. असल्याने तो चांगल्या वातावरणात वाढला आणि घडला होता. शाळेत अभ्यासासोबत इतर सर्व गोष्टीतही नेहमी पुढे असायचा. दहावी पास झाला आणि बाबांप्रमाणे सी.ए. बनण्याचे स्वप्न तो पाहू लागला. म्हणून त्याने वाणिज्य शाखेत प्रवेश घेतला. अकरावी आणि बारावीत तो खूप छान गुणांनी उत्तीर्ण झाला. त्याने महाविद्यालयात बी.कॉमला प्रवेश घेतला. आता मात्र त्याला कॉलेजची हवा लागली. वर्गात तो मागच्या बाकावर बसायची मज्जा घेऊ लागला. कधी कधी वर्गातून सुट्टी घेऊन फिरायला जाणे हे आता रोजचे झाले होते. प्रत्येक कॉलेजच्या ठराविक गटातील मुलांप्रमाणे, 'धुम्रपान केले म्हणजे आपण हिरो आहोत' अशी मानसिकता देवांश आणि त्याच्या मित्रांमध्ये निर्माण झाली. हळू हळू ते सार्वजण आपली हवा व्हावी यासाठी सुरू केलेल्या व्यसनाच्या आधीन होऊ लागले. ते नियमितपणे पार्टी करायचे. त्यात बिडी, गांजा, दारू या मादक पदार्थांचा समावेश होऊ लागला होता.

मादक पदार्थ विकत घेण्यासाठी घरून मिळालेले हात खर्चाचे पैसे पुरत नव्हते. म्हणूनच आज देवांशने त्याच्या हातातील सोन्याची अंगठी विकली होती. तो ज्या दुकानात अंगठी विकायला गेला तिथेच त्याच्या बाबांचे मित्र काही कामासाठी आले होते. ही गोष्ट त्याच्या लक्षात आली नाही. त्याने अंगठी विकली हे बाबांच्या मित्राने दुरूनच पहिले. आणि लगेच देवांशच्या बाबांना सांगितले. संध्याकाळी देवांश घरी परतला तेव्हा बाबांनी त्याला अंगठी बद्दल विचारल्यावर काहीच उत्तर न देता तो खोलीत जाऊन बसला.

खरंतर त्याला आपण जे करतोय ते चुकीचे आहे आणि आपल्याला व्यसनांचा त्रास होतोय हे कळत होते. हे करायचं नाही असं त्याने ठरवलं होतं. पण खूप प्रयत्न करून सुद्धा व्यसनापासून तो लांब जाऊ शकत नव्हता. त्याला विविध समस्यांनी घेरले होते. त्यातून उपाय शोधणे त्याच्यासाठी अशक्य झाले होते. कोणत्याही गोष्टीचे व्यसन असणे खूप लाजिरवाणी गोष्ट आहे याची जाणीव त्याला होती. म्हणून, जर कुणाला कळाले सांगितले तर लोक काय बोलतील या भीतीने तो व्यक्त होत नव्हता. स्वतः उपाय शोधण्याचा प्रयत्न करत होता पण उत्तर मात्र मिळत नव्हते. त्यासाठीच त्याला गरज होती

एखाद्या विश्वस्त व्यक्तीकडे व्यक्त होण्याची.



**शब्दांकन - संयुक्ता पाथरकर**

# धन्यवाद



## संपर्क

geeky_ideas

geeky ideas

geekyideas2020@gmail.com

Website - झेप

छायाचित्र - जान्हवी झंवर